MHOS130006472026

फौजदारी किरकोळ अर्ज/53/2026
(केशव रमेश भावले वि. महाराष्ट्र शासन)
निशाणी क्र.१ वरील आदेश

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (B.N.S.S.) कलम ५०३ अन्वये दाखल करून, भूम पोलीस ठाणे अंतर्गत गु.र.क्र. २४९/२०२६ मध्ये जप्त करण्यात आलेले वाहन मारुती सुझुकी इं.लि. इको वाहन (रजि. क्र.MH-16-CV-1697, चेसीस क्र. MA3ERLF1S00891667 व इंजिन क्र. G12BN900766 असा आहे, तो परत मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे कथन असे आहे की, अर्जदार हा राजुरी (बु.) नवगन, ता.जि. बीड, येथील रहिवासी असुन त्यास इतर महत्वाच्या कामाकरिता सदरील वाहनाची आवश्यकता भासते. जप्त वाहन हे भूम पोलिसांनी वरील नमुद गुन्ह्यात जप्त केले असुन अर्जदार हा सदर वाहनाचा मालक आहे व त्याला सदरचे वाहन वापरासाठी आवश्यक आहे. जप्त वाहन हे पोलिसांच्या ताब्यात राहिल्यास त्याचे सुटे भाग खराब होऊ शकतात. अर्जदारास सदर वाहनाची आवश्यकता असुन त्याचा ताबा परत दिल्यास तो न्यायालयाने दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करण्यास तयार आहे. तसेच सदर वाहन तपास कामी आवश्यकता असल्यास न्यायालयाचे आदेशाप्रमाणे न्यायालयात अथवा पोलिस ठाणे येथे हजर करण्यास तयार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर करुन जप्त वाहनाचा ताबा देण्याची विनंती केली आहे.

३. प्रस्तुत अर्जावर सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणणे देऊन अर्जदारास जप्त वाहनाचा ताबा देण्यास हरकत घेऊन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४. अर्जाचे, अर्जदाराच्या शपथपत्राचे व सरकारी वकील यांनी दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदाराने केलेल्या कथनांना पुष्टी देण्यासाठी त्याने वर जप्त वाहनाची प्रमाणित नोंदणी प्रमाणपत्र आर.सी.बुक प्रत, गु.र.क्र.२४९/२०२६ ची प्रथम खबर अहवालाची प्रत, वाहनाच्या विम्याची प्रत व ओळखपत्राची प्रत दाखल केली आहे. अर्जासोबत दाखल असलेल्या कागदपत्राचे व अर्जदाराच्या शपथपत्राचे अवलोकन केले असता अर्जदार हा सकृतदर्शनी जप्त वाहनाचा मालक असल्याचे दिसुन येते. सदरचे वाहन हे पोलिस स्टेशनमध्ये जमा ठेवल्याने खराब होण्याची

शक्यता नाकारता येत नाही. सरकारी वकीलांनी जरी जप्त वाहनाचा अर्जदारास ताबा देण्यास आक्षेप घेतला असला तरी त्या आक्षेपाची पुर्तता ही अर्जदारावर अटी व शर्ती लावुन साध्य करता येते कारण प्रकरण सुरू होण्यास बराच अवधी असून सदर वाहन पोलिस स्टेशनमध्ये ठेवुन कोणताही उद्देश साध्य होणार नाही.

**५.** अर्जदारास जप्त वाहन ताब्यात मिळाल्यास न्यायालय सांगेल त्यावेळी हजर करण्यास तयार आहे असे शपथपत्र दिलेले आहे. तसेच अर्जदाराशिवाय जप्त वाहनाचा ताबा इतर कोणीही मागितलेला नाही. त्यामुळे सदरचे वाहन अर्जदारास अंतरिमरित्या दिल्यास अभियोग पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे;

| **<u>आ दे श</u>** | |
|---|---|
| **१.** | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| **२.** | पोलिस निरिक्षक पोलिस स्टेशन भूम यांना निर्देशित करण्यात येते की, खालील अटी व शर्तीस अधिन राहुन अर्जदार केशव रमेश भावले यास गुन्हा क्र.२४९/२०२६ मधील मारुती सुझुकी इं.लि. इको वाहन (रजि. क्र.MH-16-CV-1697, चेसीस क्र. MA3ERLF1S00891667 व इंजिन क्र. G12BN900766 असा आहे ते वाहन खालील अटी व शर्तीवर अंतरिमरित्या परत देण्यात यावे. |
| अ. | अर्जदाराने रक्कम रुपये ४,००,०००/- (रुपये चार लाख मात्र) चे हमीपत्र द्यावे. |
| ब. | अर्जदाराने सदर वाहन प्रस्तुत गुन्ह्याचा निकाल लागेपर्यंत कोणालाही विक्री, गहाण अथवा अन्य प्रकारे हस्तांतरीत करु नये व कसलाही बदल करु नये. |
| क. | न्यायालयाने आदेश दिल्यास अथवा तपासाच्या दृष्टीने आवश्यकता भासल्यास वाहन हजर करावे. |
| ड. | अर्जदाराने स्वत:च्या खर्चाने सदर वाहनाचे प्रत्येकी चारही बाजुने फोटो काढुन त्यावर कौंटर सही करुन तपासी अधिकाऱ्याकडे जमा करावे. |
| इ. | तपासी अधिकारी यांनी सदर वाहनाचा योग्य तो पंचनामा करुन तो दोषारोप |

| | |
|---|---|
| | पत्रासोबत दाखल करावा. |
| **३.** | येणेप्रमाणे प्रकरण बंद करण्यात येते. |

AMRAPALI BABURAO JONDHALE
Digitally signed by AMRAPALI BABURAO JONDHALE
Date: 2026.06.10 18:04:25 +0530

दि : १०.०६.२०२६ **(श्रीमती. ए. बी. जोंधळे)**
ठिकाण : भूम. न्या.दं.प्र.वर्ग.भूम. (कोर्ट क्र.१)

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Shri. S. S. Hingmire, (Grade-III) |
| Court | :- | Jt. C.J.J.D. & J.M.F.C. Bhoom |
| Date | :- | 10.06.2026 |
| Order signed by the Presiding officer on | :- | 10.06.2026 |
| Order uploaded on | :- | 10.06.2026 |